प्रजावाणी दि. 03/03/2025

# दुकान फोडणाऱ्या चोरट्यांची ग्रामीण पोलिसांनी काढली आरोपींची धिंड

वार्ताहर • नवीन नांदेड



नांदेड ग्रामिण पोलिसांनी शनिवारी (दि.१) सराईत आरोपींची धिंड काढत परिसरातील नागरिकांची वाहवा मिळवली. परंतु, चोट्यांकडून त्याच रात्री सिडको परिसरातील किराणा दुकान फोडून मोठा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे ग्रामिण पोलिसांना चोरट्यांनी तुम्ही आमची धिंड काढा, आम्ही तुमची झोप उडवू, असा संदेश दिल्याची चर्चा सिडको-हडको परिसरात होताना दिसत आहे.

नांदेड ग्रामिण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर हे परिसरातील गुन्हेगारावर अकुंश ठेवण्यास कमी पडत असल्याचे दिसुन येत आहे. त्यांच्या हद्दीत असणारे गुन्हेगार दिवसा हातात तलवारी घेत परिसरात दहशतवाद करत आहेत. या गुन्हेगातील एका गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पायावर गोळी मारत भैया मिरासे यास झरी येथे जेरबंद केल्याची घटना ताजी असताना, मिरासे यांच्या सोबत राहणारे त्याचे साधीदार दिग्विजय नाडागुडे, गणेश मोरे, डोरेमोन उर्फ संघरत्न वाघमारे या आरोपींवर ग्रामिण पोलिसाकडून कार्यवाही करत त्यांची सिडको-हडको परिसरातून धिंड काढली होती. यामुळे सिडको-हडको परिसरात त्यांची दहशत नक्कीच कमी झाली आहे.

ग्रामिण पोलिस ठाण्याचा हद्दीत असलेल्या सिडको परिसरातील महाविर चौक येथील हरी ओम किराणा दुकानाचे शटर वाकून चोरट्यांनी रविवारी (दि. दोन) पहाटे दुकानातील ऐवज लंपास केल्याची घटना घडली. या घटनेची माहिती दुकानदाराने पोलिसांच्या ११२ नंबरवर दिली. परंतु, ही माहिती मिळूनही पोलिस मात्र नेहमीच्या सवयीप्रमाणे सकाळी आठ वाजता आल्याची माहीती दुकानचालकांनी दिली. त्यानंतर चोरट्यांनी दुकान फोडल्याची माहिती घेऊन दुकानदार हे ग्रामीण पोलीस ठाण्यात गेले असता त्यांना येथील कर्मचाऱ्यांनी पिटाळून लावले. त्यांनी व्यापारी मित्रांना घेवुन जिल्हा पोलिस प्रमुख यांची भेट घेत आपली आप बिती सांगितली. त्यानंतर गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्यानंतर नागरिकात मात्र पोलिसांनी काल काढलेल्या धिंडचा बदला म्हणून चोरट्यांनी त्याना सलामी दिल्याची चर्चा होत होती.